# कमला कॉलेजचे राष्ट्रीय सेवा शिबिर

**टेंबलाईवाडी :** पडवळवाडी येथे कमला कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर झाले. सरपंच सौ. आक्काताई व्हरकटे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. प्रभारी प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर अध्यक्षस्थानी होत्या. स्वच्छ भारत-स्वस्थ भारत अभियानाच्या उद्धीष्ट पूर्तीसाठी विविध उपक्रम राबविले. गावातील सर्व रस्त्यांची स्वच्छता केली. प्राथमिक शाळेच्या परिसरातील झाडांना आळी करून पाणी घातले. श्री यमाई देवीचा परिसर स्वच्छ केला. वरच्या वाडीतील पाण्याच्या टाकीजवळचा परिसर स्वच्छ केला. तसेच पटनाट्यही सादर केले. प्रा. रेखा पंडित, प्रा. एन. एस. शिरोळकर, प्रा. पी. एस. जाधव, हरिभाऊ वनमोरे, प्रा. बेनझीर शिकलगार, प्रा. स्नेहा बुगडे, प्रा. प्रत्येच्या राजाज्ञा, प्रा. रवीना कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. छायाचित्रकार बी. डी. चेचर यांचे 'छायाचित्रांचा इतिहास' यावर प्रात्यक्षिकासह व्याख्यान झाले. ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, सचिव मा. प्राजक्त पाटील यांनी प्रोत्साहन दिले. प्रा. अनिल घस्ते, प्रा. डॉ. सुजय पाटील यांनी संयोजन केले. प्रा. रेखा पंडित, प्रा. अमृता दिंडे यांनी सहकार्य केले. मुख्याध्यापक, सरपंच, उपसरपंच बाळकृष्ण पडवळ यांनी सहकार्य केले.

सकाळ - 18-1-2020

Scanned by CamScanner